प्रकरण चौथे

# करार ग्रामीण भागाचे टिकात्मक परीक्षण

प्रकरण चौथे

# कराड ग्रामीण भागाचे टिकात्मक परिक्षण

४.१ प्रस्तावना

४.२ नागरीकरण व त्रिशंकू भागांचा प्रश्न

४.३ विकास प्रक्रियेत दुर्लक्षिला जाणारा मुद्दा

४.४ कराड ग्रामीण पुढील समस्यांची कारण मीमांसा

४.५ १२ सर्व्हे नंबर्समधील नागरिकांची भूमिका व दबावाचे राजकारण

४.६ उपाययोजना

४.७ संदर्भ

प्रकरण चौथे

# कराड ग्रामीण भागाचे टिकात्मक परीक्षण

## ४.१ प्रस्तावना -

**"नातरी नगरांतरी वसिजे। तरी नागरांची होईजे ।।"**

ज्ञानेश्वरी १:४११७:४०७

श्री ज्ञानेश्वरांची तेराव्या शतकातील ही उक्ती सध्याच्या एकंदर परिस्थितीचा विचार करता कितपत यथार्थ होईल, याबद्दल शंका वाटावी. नगरात वस्ती करून राहिलेला मनुष्य शहाणा व समंजस होतो, नगरांमुळे संस्कृतीची वाढ होते व आर्थिक प्रगती होते. हे प्राचीन काळातील मोहेंजोदडो, हडप्पा, ऊर, बॅबिलोन, ग्रीसमधील अथेन्स, स्पार्टा व भारतातील गुप्त साम्राज्यकालीन राजधान्या, बगदाद, मोगलकालीन दिल्ली, व त्यांनी निर्माण केलेल्या संस्कृती पाहता प्रत्ययास येते. तथापि आजकालची महानगरे व शहरे मानवी जीवन समृद्ध करीत आहेत की निकृष्टावस्थेत नेत आहेत हा प्रश्न विचारवंतांना भेडसावीत आहे. मुंबई, कलकत्ता, मद्रास अशा शहरांमधील विलक्षण दाटी, वाहतुकीची ओढाताण, शुद्ध हवा व निवास यासारख्या नागरिकांच्या मूलभूत गरजा भागविताना येणाऱ्या अडचणी, बेकारांचे तांडे, झोपडपट्ट्या या सर्व गोष्टी पाहिल्या व अनुभवल्या तर शहरांमुळे आर्थिक समृद्धी येते व संस्कृतीचो देवाणघेवाण होते असे म्हणणे धाडसाचे ठरेल.[१]

करांड ग्रामीणची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. शहरीकरणाच्या प्रक्रियेत करांड ग्रामीणमध्ये रोजगार, नोकरी, व्यवसाय अशा विविध गरजा आणि मनिषा मनात घेऊन भारतातील विविध ठिकाणचे लोक, अनेक जातीधर्माचे लोक या परिसरात जमा होऊन एक संमिश्र संस्कृती आणि समृद्धता निर्माण करणारा कॉस्मॉपॉलिटन समाज निर्माण होईल ही अशा लोप पावली आहे. त्याजागी गैरसाईंनी बजबजलेली आणि हैराण झालेली अनियंत्रित गलिच्छ वस्त्या, बेकारी, बेरोजगारी आणि त्यामुळे गुन्हेगारीकडे वळलेल्या युवकांचे तांडे हे चित्र करांड ग्रामीणमध्ये स्पष्टपणे दिसते.

शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कराड शहराच्या शेजारी वाढत चाललेली ही अनियंत्रित वसाहत आणि त्यामध्ये दिवसागणिक वाढत जाणाऱ्या गैरसाई आणि या मानवी समुदायाला या भीषण संकटातून वाचविण्याकरिता राजकारण्यांनी केलेला केविलवाणा प्रयत्न व त्यातूनच श्रेयवादाकरिता चाललेले शह-काटशहाचे राजकारण. परस्पर विरोधी भूमिका, विरोधासाठी विरोध, राजकीय वर्चस्व मिळवण्याची धडपड आणि त्यातूनच वर्षानुवर्षे खितपत पडलेला कराड ग्रामीण मध्ये राहणारा नागरिक आणि एक नागरीक म्हणून स्वतःचे जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी तेथील नागरिकांच्या मनामध्ये असलेले नैराश्य, इच्छाशक्तीचा अभाव आणि नागरी सुविधांच्या मागणीसाठी कराव्या लागणाऱ्या पाठपुराव्याचा अभाव असे चित्र कराड ग्रामीणमध्ये दिसत असून ते चित्र दिवसेंदिवस अधिकाधिक ठळक होताना दिसते.

कराड ग्रामीणची एकूण परिस्थिती, राजकारणाची दिशाहीन वाटचाल, बेभान आणि सैरभैर झालेला नागरिक, शासकीय योजनांची कमतरता कराड नगरपरिषदेच्या अधिकारांच्या मर्यादा आणि या परिसरातील नागरी सुविधांची उपलब्धता आणि त्यातून तेथील मानवी जीवनावर होणारा दूरगामी परिणाम यांचा मेळ घालताना कराड ग्रामीणमधील नागरिकांना नागरी सुविधा मिळणे जवळच्या काळात अशक्य दिसते. सर्व सोईनियुक्त, सुसज्य शहरात राहण्याचे येथील नागरिकांचे भवितव्य अंधारात आहे. जर यावर व्यापक आणि ठोस उपाय केला नाही व नागरिकांनी त्यासाठी जनमताचा रेटा लावला नाही. तर कराड ग्रामीणचा हा भाग वर्षानुवर्षे असाच राहिल व दिवसेंदिवस तो अधिक विद्रूप आणि कुरूप बनेल.

## ४.२ नागरीकरण व त्रिशंकू भागांचा प्रश्न -

औद्योगिक क्रांतीमुळे जगभरात नागरीकरणाला सुरूवात झाली. हे जरी सत्य असले तरी जगभरातील शहरांची पार्श्वभूमी पाहिली असता आज शहरे, महानगरे, औद्योगिकरणाच्या आधीपासून किंवा प्राचीन काळापासून अस्तित्त्वात असलेली दिसतात. मोहेंजोदडो, बॅबिलोन, स्पार्टा, अथेन्स, पाटलीपुत्र, नालंदा, गया, उजैन,

मदुराई, विजयनगर, विजापूर, हैदराबाद, ग्वाल्हेर, पुणे इ. शहरे ही औद्योगिक क्रांतीपूर्व वसलेली आणि वैभवशाली शहरे होत. या शहरांच्या निर्मितीची कारणे निराळी आहेत. कृषी समृद्धी , व्यापार, राजकीय केंद्र, धर्मपीठांचे केंद्र आणि संरक्षण या माध्यमातून ही शहरे निर्माण झाली व आजपर्यंत अस्तित्वात आहेत. परंतू या शहरांची स्थापना आणि विकास शेकडो वर्षांच्या कालक्रमणात, काळाच्या ओघात हळूहळू अतिशय संथ गतीने झालेला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर मात्र शहरीकरणांची अधिक गती प्राप्त केली. त्यामुळे औद्योगिक हेच आधुनिक युगातील नागरीभवनाचे मुख्य कारण दिसते. 'यंत्र' हे अथक उत्पादनाचे व दळणवळणाचे प्रमुख साधन बनले. यंत्रामुळे मोठमोठे कारखाने उभे राहिले. असे कारखाने ज्या ठिकाणी उभारले गेले त्या स्थानांना अल्पावधीतच शहरांचे स्वरूप प्राप्त झाले आणि हळूहळू याच शहरांमध्ये लोकसंख्येची दाटी होऊन शहरांनी महानगरांचे रूप लयायले.

शहरीकरण ही वैश्विक स्वरूपाची प्रक्रिया बनलेली आहे. आणि अशा शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये पुर्वनियोजित शहरे आणि वसाहती निर्माण करण्यासाठी शासनाजवळ उपलब्ध असलेली यंत्रण, मानवी संसाधन आणि शहरीकरणाचा वेग यांचा ताळमेळ न बसल्यामुळे किंबहुना लोकशाही आणि लोककल्याणकारी राज्याची पाटी गळयात अडकवून फिरणाऱ्या सरकारांजवळ तेवढ्या जाणीवा आणि गांभिर्य नसल्यामुळेच त्रिशंकु भागांचा जन्म झाला.

असे त्रिशंकू भाग प्रत्येक शहरांना खेटून लहान मोठ्या आकारात उभे असलेले दिसतात. या सर्व त्रिशंकू भागांचे स्वरूप कमी अधिक प्रमाणात एक सारखेच दिसते. या त्रिशंकू भागांमध्ये कोणतेही नियोजन, नियंत्रण आणि विकासाला जबाबदार कोणतीच यंत्रणा नसल्यामुळे असे त्रिशंकु भाग बेवारस आणि शिड फाटलेल्या जहाजासारखे दिशाहीन बनले आहेत.

कृषी उत्पादनाबरोबरच औद्योगिकरण आणि व्यापार ही अर्थव्यवस्थेची प्रमुख घटक असतात आणि त्या अनुषंगाने येणारे नागरीकरण ही अनिवार्य आणि अपरिहार्य

ठरणारी बाब आहे. औद्योगिकरणाची प्रक्रिया आणि त्यातून मिळणारे उत्पन्न या भोवतीच पिंगा घालणारी शासनाची त्रोटक धोरणे यामुळे शहरांच्या आसपास अतिशय गलिच्छ आणि घाणेरड्या वसाहती निर्माण झाल्या आणि त्यातूनच नागर समाजामध्ये अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या.

असा त्रिशंकू भागांचा अभ्यास करताना या परिसरातील गंभीर समस्या आणि तेथील मानवी जीवन हाच अभ्यासाचा मुख्य गाभा ठरत जातो आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवन जगणाऱ्या नागरिकांच्याकडे जगातील सर्वात मोठ्या संसदिय लोकाशाही राष्ट्राचा अतिशय थंड आणि निष्क्रीय सरकारे, दूरदृष्टीचा अभाव असलेली राष्ट्रीय धोरणे आणि हे सर्व मोकाटपणे सहन करणारी नागरी समाजाची कोडगी मने यांच्या अभद्रयुतीनेच नागरी समाजाला असुरक्षीततेच्या खाईत लोटणारा प्रपंच निर्माण झालेला आहे.

नागरीकरणाच्या अपरिहार्यतेला स्विकारताना त्याच्या बरोबर येणाऱ्या असंख्य समस्यांचा स्विकार करताना नागरी समाजाला कसलाच संकोच किंवा भीती वाटू नये हे भारतीय संस्कृतीला कधीही न पेलणारे आणि न पटणरे असताना सुद्धा भारतीय नागरी समाजाने ते बिनबोभाट पणे स्वीकारले आहे. लोकशाही मार्गाने करावयाचा विरोध देखील दिवसागणिक क्षीण होत चालला आहे. प्रत्येक व्यक्ती स्वार्थी आणि स्वयंकेंद्रित बनत असताना, या सर्व प्रतिकूल परिस्थितींचा पर्दाफाश करून विरोध करणारी जन आंदोलने ही नागर समाजाच्या इच्छाशक्ती अभावी इतिहास जमा होऊ लागली आहेत. आपले अधिकार प्राप्त करून घेण्याची जिज्ञासादेखील नागरी समाज हरवून बसला यापेक्षा मोठे संकट बहुदा कोणतेही नसावे.

प्रत्येक शहराच्या आसपास असणाऱ्या त्रिशंकु भागामधून फेरफटका मारल्यास या परिसरातील समस्या आणि त्यांचे गांभीर्य नजरेत भरते. दिवाबत्ती अभावी अंधार, चाचपडणारी माणसे, पेयजलाच्या प्राप्तीसाठी दिवसभर लागलेल्या बाया बापड्यांच्या लांबच-लांब रांगा, अरूद चिंचोळे आणि वेडेवाकडे रस्ते गटारांअभावी दारोदारी

साचलेली सांडपाण्याची गलिच्छ, डबकी, त्यातून असणारा जनावरांचा वावर, पुरेशा प्रमाणात नसलेल्या शाळांमुळे प्रत्येक वर्ग खोल्यांमधून ओसंडून वाहणारा विद्यार्थ्यांचा लोंढा. सार्वजनिक ठिकाणी दिसून येणारे बेरोजगारांचे जथ्थे, बेकारी, बेरोजगारी आणि वैफल्याने पछाडलेली व्यसनाधीन तरूणाई, झोपडपट्टयामध्ये फोफावलेली वेश्यावृत्ती, गुन्हे, नागरी सुविधा अभावी निर्माण झालेली बजबजपूरी आणि या सर्व बाबींकडे सोईस्कर पणे दुर्लक्ष करणारी राज्यकर्त्यांची मनोवृत्ती यातून त्रिशंकू भागात राहणाऱ्या नागरीकांचे जीवन नरकतुल्य बनले आहे. अशा अनेक नागरी, आर्थिक समस्यांनी ग्रासलेल्या नागरिकांना सोडविण्यासाठी सरकारजवळ नजीकच्या काळात कोणतीही उपाययोजना नाही. हीच एक मुख्य समस्या आहे.

## ४.३ विकास प्रक्रियेत दुर्लक्षिला जाणारा मुद्दा -

मजल दरमजल करीत २१ व्या शतकात पोहोचल्यानंतर प्रगतीच्या दिशेने वेगाने धावणाऱ्या जगाकडे डोळे विस्फारून पाहताना, भारताचे राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी २०२० साली भारत कसा असेल याचे चितारलेले कल्पनाचित्र पाहताना २०२० सालच्या विकसित भारतात तरी देशभरातल्या त्रिशंकू भागांचा विकास झालेला असेल का? की हे त्रिशंकू भाग तेवढे सोडून संपूर्ण भारत विकसित झालेला असेल? अशा एक ना दोन असंख्य प्रश्नांचे इथल्या नागरिकांच्या मनात काहूर दाटते आणि तसे वाटणे नैसर्गिक आणि व्यवहार्य आहे. कारण ज्या पद्धतीने इथले राजकारण चाललेले आहे. ज्या पद्धतीने शासनाची धोरणे राबवली जात आहेत, ज्या पद्धतीने निर्णय प्रक्रिया होत आहे. यासर्वांचा एकत्रित विचार करता कराड ग्रामीणचे भवितव्य अधांतरी दिसते.

या सर्व गोष्टी शासनसंस्थेला माहित नाहीत किंवा अगदी नवख्या आहेत असे नाही. परंतू पक्षिय राजकारण, शह-काटशहाचे राजकारण, विरोधासाठी विरोध, श्रेयवादाचे राजकारण या सर्व अडथळ्यांच्या शर्यतीमधून पार पडता पडता कराड ग्रामीणची पुरती दमछाक झालेली आहे आणि इथल्या नागरीकाला धाप्या

टाकण्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही. कराड ग्रामीणची कराड शहर हद्दीमध्ये सामावून घेण्यासाठी १९६१ पासून चाललेल्या नगरपालिकेच्या धडपडीला जवळपास ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत. दुसऱ्या बाजूला विकासाला जबबदार अशा सरकारकडे पाहिल्यास कोंबडी गिळून सुस्तावेल्या आजगरासारखी बेदरकार शासनाची भूमिका तिसऱ्या बाजूला या परिसरामध्ये स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करायची की कराड नगरपालिका हद्दीमध्ये समावेश करायचा या न सुटणाऱ्या प्रश्नांच्या जंजाळात अडकलेले पक्षिय राजकारण आणि चौथ्या बाजुला निद्रिस्त आणि पराकोटीची सहनशिलता असलेला मुका, बहिरा लोकसमुदाय या चक्रव्युहातून कराड ग्रामीणची सुटका होणे नजिकच्या काळात अशक्य वाटते.

## ४.४ कराड ग्रामीण पुढील समस्यांची कारण मीमांसा -

कराड ग्रामीणमध्ये ज्या काही समस्या निर्माण झाल्या आहेत त्या समस्यांना केवळ सरकार, लोक, औद्योगिक क्रांती असा एकच घटक कारणीभूत नाही तर तो अनेक कारणांचा एकत्रीत परिणाम आहे असे म्हणावे लागेल. कोणतीही सामाजिक घटना किंवा घडामोडी घडत असताना त्याला अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात. त्याचप्रमाणे कराड ग्रामीणचीसुद्धा अशी अवस्था व्हायला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. या सर्व कारणांची सखोल मीमांसा करणे ही अत्यंत आवश्यक आणि अपरिहार्य बाब ठरते.

### १. लोकसंख्या -

कराड शहराचा मर्यादित क्षेत्रीय विकास आणि कालौघात वाढणाऱ्या अतिरिक्त लोकसंख्येला सामावून घेण्यास कराड शहराची हद्द असमर्थ ठरली. वाढत्या लोकसंख्येच्या रहिवासी जागेचा पेचप्रसंग निर्माण झाल्यामुळेच शहराच्या हद्दीबाहेर मिळेल तिथे जमेल तशी घरे बांधण्यास लोकांनी सुरूवात केली. या वाढत्या वस्त्यांवर कुणाचेही नियंत्रण नसल्यामुळे तसेच विकासाला जबाबदार कोणीच नसल्यामुळे बकाल

आणि गलिच्छ वस्त्या निर्माण झाल्या. या समाजाची आर्थिक स्थिती खालच्या दर्जाची असल्यामुळे त्याच प्रकारच्या वस्त्या निर्माण होणे साहजिकच आहे. अर्थात शहरात वाढणारी भरमसाठ लोकसंख्येची दाटी किंवा अतिरिक्त लोकसंख्या हेच कराड ग्रामीणमधील समस्यांचे पहिले कारण आहे.

**२. रहिवासी जागेचा तुटवडा -**

कराड शहराचा भौगोलिक विस्तार हा नैसर्गिकपणेच अतिशय मर्यादित आहे. शहराच्या पश्चिम आणि उत्तरेला कृष्णा व कोयना या बारमाही वाहणाऱ्या नद्या असल्यामुळे त्या बाजूला नैसर्गिकपणे शहर हद्दीला मर्यादा पडते. पूर्वला असणारे कराड विटा रोडपर्यंत मर्यादा तसेच दक्षिणेला कोल्हापूर नाका आणि कार्वेनाक्या पर्यंतच शहराचा क्षेत्रिय विकास आहे. हे क्षेत्र अतिशय मर्यादित आहे. लोकसंख्येच्या प्रचंड वाढीमुळे शहरातील रहिवासी घरे आणि जागेच्या किंमती गगनाला भिडल्या. अशा महागड्या जमिनी आणि घरे सामान्य, मध्यमवर्ग आणि गोरगरिंबाना न परवडणाऱ्या होत्या. पर्यायाने स्वतःच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्यांनी शहरालगतच्या शेत जमीनी गुंठ्याच्या भावाने खरेदी केल्या. आणि त्यामध्ये प्रपंच थाटले. या प्रक्रियेत त्यांच्यावर नियंत्रण करणरा कोणीच नसल्यामुळे अनियंत्रीत, अनिर्बंध अशा झोपडपट्टीवजा वसाहतींची निर्मिती झाली. या अर्थाने पाहिल्यास कराड शहरातील जागेच्या भरमसाठ किंमती हेच कराड ग्रामीणच्या निर्मितीस कारणीभूत ठरले व अशा बेधूंद वसाहतीच कराड ग्रामीण मधील समस्यांना कारणीभूत ठरल्या.

**३. टाऊन प्लॅनिंगचा अभाव -**

हरियाणा, पुण्याचा प्राधिकरण हा परिसर पाहिल्यास टाऊन प्लॅनिंगचे महत्त्व कळते. कोणत्याही आदर्श वसाहती निर्माण होण्यापूर्वी जर तेथे पुर्वनियोजित टाऊन प्लॅनिंग केल्यास मानवी जीवनाला उपकारक ठरतील आशा आदर्श वसाहती निर्माण होतात हे अनेक उदाहरणांवरून आपणास स्पष्ट करता येते. कराड ग्रामीणच्या

दुर्दशेला पुरक आणि पोषक ठरलेला आणखी एक घटक म्हणजे या परिसरामध्ये दिसणारा टाऊन प्लॅनिंगचा अभाव होय. कराड ग्रामीणमध्ये कोणत्याही प्रकारचे टाऊन प्लॅनिंग झालेले नाही. हे एक कटू सत्य असले तरी त्याची दुसरी बाजू देखील तेवढीच पांगळी आहे. टाऊन प्लॅनिंगची अत्यंतीक आवश्यकता भासत असताना देखील हे टाऊन प्लॅनिंग करायचे कोणी? जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न आवासून उभे राहतात. कराड ग्रामीणमध्ये कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था आस्तित्त्वात नाही किंवा कोणत्याही शेजारच्या हद्दीमध्ये त्याचा समावेश नाही. त्या कारणाने टाऊन प्लॅनिंग सारखे फार मोठे रचनात्मक कार्याची जबाबदारी घ्यायची कोणी असा गहनप्रश्न निर्माण होतो. टाऊन प्लॅनिंग अभावी घरे बांधणीवर नियंत्रण, पुरेपूर रूंदीची रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा गटारे, दिवाबत्ती, भुयारी गटारे, सार्वजनिक ठिकाणे, चौक, उद्याने, क्रिडांगणे, शासकीय कार्यालये, फूटपाथ, वाहनतळ, अशा कोणत्याही सुविधा कराड ग्रामीणमध्ये उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. यामुळेच कराड ग्रामीणमधील समस्यांनी उग्र रूप धारण केले म्हणजेच टाऊन प्लॅनिंगचा अभाव हे कराड ग्रामीणमधील समस्यांचे कारण आहे.

### ४. राजकीय मतैक्याचा अभाव -

कराड ग्रामीण मधील पक्षीय राजकारणाचा विचार केल्यास या भागात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोनच पक्ष प्रभावीत आहेत. इतर कोणत्याही पक्षाचे अस्तित्व नसल्याच्या प्रमाणात आहे. जनाधार असलेल्या दोन्ही काँग्रेसमध्ये या परिसराच्या विकासाला धरून पराकोटीचे मतभेद दिसतात. या मतभेदामागील भुमिका पक्षाधिष्टित नसली तरी स्थानिक राजकारणाशी निगडीत आहे. या भागाचे पंचायत समिती, विधानसभा आणि लोकसभेत प्रतिनिधीत्व राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. जिल्हा परिषदे मध्ये मात्र काँग्रेस-आयकडे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये श्री. श्रीनिवास पाटील, श्री. पी.डी. पाटील, श्री. बाळासाहेब पाटील असे दिग्गज नेते तर राष्ट्रीय काँग्रेसमध्ये केंद्रीय मंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. जगदीश जगताप, सौ. विद्याताई जगताप, श्री.

आनंदराव पाटील असे नेते आहेत. कराड ग्रामीणचा विकास साधण्यासाठी या परिसराचा कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समावेश केल्या शिवाय पर्याय नाही ही भूमिका राष्ट्रवादीच्या गोटातून मांडली जाते व त्या दृष्टीने प्रयत्नदेखील चालू आहेत. तर ह्या परिसरात स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करावी अशी भूमिका राष्ट्रीय काँग्रेसच्या गोटातून मांडली जाते. वास्तविक पाहता या दोन्ही पक्षांची केंद्रात व राज्यात आघाडी असताना स्थानिक प्रश्नांवर मात्र एकत्र न येता येथील २० ते २२ हजार जनतेच्या हालअपेष्टांकडे सोईस्करपणे दुर्लक्ष केले जाते. विकासाच्या किंवा नगरिकांच्या जीवन मरणाच्या मुद्यावर दोन प्रमुख पक्षांमध्ये मतैक्य न होणे आणि त्यामुळेच जनतेच्या नशिबी दुर्दैव येणे ही एक नामुष्कीची बाब आहे. अर्थात कराड ग्रामीणच्या विकासाबाबत राजकीय पातळीवर मतैक्य नसणे हे या परिसरातील समस्यांचे एक कारण ठरते.

## ५. नागरिकांची भूमिका -

कराड ग्रामीणची झालेली दैन्यावस्था किंवा भविष्यकाळात जर विकास झाला तर त्या दोन्ही गोष्टींना तेथील नागरीकच कारणीभूत असणार आहेत. या परिसरातील समस्या गंभीर आहेत व दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत आहेत. परंतू या सर्व समस्या शांत आणि मुकाटपणे सहन करण्याच्या आणि विकासाचा आग्रह न धरण्याच्या बोटचेप्या भूमिकेमुळेच या समस्या उग्र रूप धारण करीत आहेत. विकास प्रक्रियेबाबत असलेले नागरिकांचे औदासिन्य आणि त्यातून येणारी निष्क्रियता हे एक मोठे संकट म्हणून समोर आलेले आहे. जोपर्यंत नागरीक विकास प्रक्रियेबाबत आक्रमक होत नाहीत, आपले नैराश्य झटकून समस्यांबाबत आवाज उठवत नाहीत तो पर्यंत या परिसरातील नागरीकांना या नरकयातनांमधून मुक्तता नाही. या वरून स्पष्ट होते की, या परिसरातील गैरसोई आणि समस्यांना नागरीकांची सहनशीलता आणि उदासिनता हा घटक देखील कारणीभूत ठरतो.

## ६. शासकीय धोरणांची संदिग्धता -

या प्रश्नाची व्याप्ती सार्वत्रिक किंवा जागतिक स्वरूपाची आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये हा प्रश्न सोडविणे आत्यंतिक महत्त्वाचे आहे. भारतातील प्रत्येक शहराच्या आसपास असे त्रिशंकू परिसर आहेत आणि या परिसरांमधून राहणाऱ्यांची लोकसंख्यादेखील प्रचंड आहे. त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या प्रश्नांची व्यपकता देखील तेवढीच आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक समस्यांचा महापूर आलेला आहे. ही परिस्थिती सार्वभौम लोकशाही राष्ट्राच्या दृष्टीने योग्य नाही. भविष्य काळात या परिस्थितीवर मात करणारी धोरणे आणि निर्णय प्रक्रिया झाली नाही तर फार मोठे अराजक निर्माण होण्याचा धोका संभवतो. अशीच मानसिकता कराड ग्रामीण मधील नागरीकांची असलेली दिसते. हा प्रश्न सर्व नागरी प्रश्नांपेक्षा अधिक गंभीर असल्याचे संभवतो आणि एवढा गंभीर प्रश्न असताना सुद्धा आणि तो सार्वत्रिक असतानासुद्धा तो सोडविणेच्या बाबतीत मात्र शासनपातळीवर म्हणावे तेवढी तळमळ किंवा गांभीर्य दिसत नाही. त्रिशंकू विकास निधी, १२ वा वित्त आयोग, यशवंत ग्रामसमृद्धी योजना या सारख्या एकदम त्रोटक निधी असलेल्या योजना या परिसराचा विकास करण्यास अपयशी ठरलेल्या आहेत. तेथील एकूण समस्या, उपलब्ध निधी आणि त्या योजनांच्या अंमलबजावणी करिता असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अभाव यांचा कुठेही मेळ बसत नाही.

## ७. समाजसेवी संस्था संघटनांची भूमिका -

समाज कोणताही असो, कुठलाही असो तो कमी अधिक प्रमाणात निद्रावस्थेत असतो. समाजातील प्रत्येक माणूस हा आपल्या समोरील प्रश्नांबाबत जागृत आणि तत्पर असलेच असे नाही. किंबहुना समाजातील बहुतांश नागरीक हे सामाजिक प्रश्नांबाबत निद्रावस्थेत किंवा उदासीन तसेच बेदखल असतात. अशा समाजाला जागे करून त्यांना आपल्या अधिकार व हक्कांची जाणीव करून देऊन, विविध मागण्या, विनंत्या करून प्रसंगी आंदोलने करून लोकांना शहणे करणे व विकासाभिमुख

वातावरण तयार करणे, समस्या सोडविण्यासाठी निरपेक्षवृत्तीने दबावगट निर्माण करून राज्यकर्ते आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करणे हे कार्य समाजसेवी संघटनांचे असते. या संघटनांमधील शहाण्या आणि बुद्धीजीवी वर्गाने सर्वसामान्य माणसाला हाताशी धरून मजबूत संघटन करून, समस्या सोडविण्यासाठी निर्भयपणे निर्णय घेतले पाहिजेत. तर त्या परिसरातील प्रश्नांची दखल घेतली जाईल. अन्यथा तेथील विकास हे एक स्वप्नरंजन ठरण्याचा धोका आहे.  कराड ग्रामीण मधील समाजसेवी संघटनांच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे. मुळात या परिसरात अल्प प्रमाणात समाजसेवी संघटना आहेत आणि त्यांचे उद्दिष्टे वेगळी आहेत. त्यामुळे त्या संघटना या प्रश्नांवर आवाज उठवत नाहीत. या परिसरातील गंभीर समस्या हा मुद्दा केंद्रीभूत मानून तो सोडविण्याच्या उद्देशाने एक ही संघटना निर्माण झालेली नाही. आजपर्यंत या प्रश्नावर एक ही लोक आंदोलन उभे राहिलेले नाही. परिणामी शासनदरबारी त्यांची दखल घेतली गेलेली नाही.

वर उल्लेख केलेली सर्व कारणे कराड ग्रामीणच्या त्रिशंकू भागाच्या दुर्दैवाला कारणीभूत ठरणाऱ्या आहेत. समस्या किंवा अडीअडचणी सर्व ठिकाणी असतात. परंतू त्या सोडविण्याची मानसिकता आणि तळमळ जनता आणि शासन या दोघांना असली पाहिजे. समस्या निर्माण करणारा हा दोषी असतोच पण ती समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न न करणारादेखील तेवढाच दोषी असतो. या अनुषंगाने कराड ग्रामीण मधील समस्या निर्माण करण्यास तेथील बेजबाबदार, बेदरकार आणि अनियंत्रित माणूस जेवढा जबाबदार तेवढीच जबाबदार शासन यंत्रणा आहे. हे एक त्रिकालाबाधीत सत्य आहे.

## ४.५ १२ सर्व्हे नबंर्समधील नागरिकांची भूमिका व दबावाचे राजकारण

कराड ग्रामीणचा कराड शहर हद्दीमध्ये समावेश होण्याच्या मार्गातील सर्व मोठे अडथळे दूर झालेले आहेत. राहिलेला आहे म्हणजे एकच मुद्दा, तो म्हणजे तेथील १२ सर्व्हे नंबर्स मधील नागरिकांची भूमिका. हे सर्व नंबर्स निम्नलिखित प्रमाणे आहेत.

३९९, ४०६, ४०७, ४०८, ४०९ ,४१० , ४१५, ४१६, ४१७, ४२१, ४२२, ४२३ असे हे १२ सर्व्हे नंबर्स आहेत.

सदर १२ सर्व्हे नंबर्समध्ये राहणाऱ्या नागरीकांच्या भूमिकेमागे आर्थिक आणि राजकीय हितसंबंध असल्याचे दिसते. हा परिसर व्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या विकसित झालेला आहे. त्यामध्ये अनेक उद्योग, व्यवासाय, सेवा व्यवसाय, दवाखाने,व्यापार असे अनेक उत्पन्नाच्या दृष्टीने पूरक आणि पोषक ठरणारे घटक इथे आहेत. त्यातून मलकापूर ग्रामपंचायतीला कर रूपाने चांगले उत्पन्न मिळते व ही घसघसीत मिळणारी राशी हेच दोन्ही स्वराज्य संस्थांच्या आकर्षणाचे कारण आहे. त्याचबरोबर या परिसरात काही मोठ्या,उच्चभ्रु आसामी राहतात. त्यांचे हितसंबंध जोपासणे हा देखील एक दृष्टीकोण त्यामागे आहे.

या परिसरामध्ये राहणाऱ्या नागरिकांची आर्थिक आणि राजकीय अशा दोन्ही स्वरूपाच्या भूमिका दिसतात. त्यातील आर्थिक विचार असा, हा परिसर मलकापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये राहिल्यास ग्रामपंचायतीला घरपट्टी, पाणीपट्टी, वीज बिल यासारखे तत्सम कर कमी प्रमाणत असतात व ते सहज भरता येण्याजोगे असतात. उलट नगरपालिका हद्दीमध्ये या सर्व करांपोटी द्यावी लागणारी रक्कम जास्त आहे व ती भरणे म्हणजे मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागेल. ही भीती आहेच त्याच बरोबर शहरहद्दीत गेल्यास शहरी टी.पी. स्कीम प्रमाणे बांधकाम करावे लागणार, रस्ते, बागा, शाळा, कार्यालये, इ. करीता जागेचे आरक्षण झाल्यास लाखमोलाच्या जमीनी फुकापासरी जातील या भीतीपोटी निर्माण झालेला आर्थिक दृष्टीकोण व दुसरा राजकीय भूमिकेने प्रेरीत झालेला दृष्टीकोण होय.

हा परिसर कराड हद्दीत समाविष्ट झाल्यास आपले राजकीय आस्तित्व संपुष्टात येईल. नगरपालिकेच्या राजकारणात सर्व काही नव्याने मांडणी करावी लागेल. नगरपालिकेवर वर्चस्व मिळविण्यासाठी हवा असलेला तेवढा लोकमताचा पाठिंबादेखील या परिसरातून मिळणार नाही. परिणामी तेथील कोणत्या तरी आघाडीत

सामील होवून जगावे लागणार, त्याऐवजी मलकापूर ग्रामपंचायतीमध्ये राहिल्यास एक मजबूत दबावगट निर्माण करता येतो. त्या माध्यमातून ग्रामपंचायतीवर आपला वचक राहतो. त्याचबरोबर नगरपंचायत किंवा 'क' वर्ग नगरपालिका मिळवता येईल. आपले एक स्वतंत्र राजकीय आस्तित्व निर्माण होईल व या बळावर पुढे बरीच मोठी राजकीय मजल मारता येईल. तसेच मर्यादित लोकांचा मजबूत राजकीय गट निर्माण करता येईल. त्यातून राजकीय एकजिनसी समुदाय तयार करून राजकारणावर प्रभाव पाडता येतो आणि त्यायोगे ग्रामपंचायतीकडून विविध सेवा सवलती मिळवता येतात. असा एक राजकीय दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून येथील लोक मलकापूर ग्रामपंचायत हद्दीमध्ये राहण्याच्या मानसिकतेत आहेत. किंबहुना तसा प्रयत्नदेखील केलेला आहे.

या परिसरातील सर्व नागरीक मलकापूर ग्रामपंचायतीकडून मिळणाऱ्या सर्व सेवा, सुविधा स्वीकारतात व त्या बदल्यात ग्रामपंचायतीला कर भरतात व त्यांना मलकापूर ग्रामपंचायत हद्दीमध्येच रहावयाचे असल्याचे लेखी निवेदन त्यांनी मलकापूर ग्रामपंचायतीस दिलेले आहे.

वरील सर्व विवेचनाचा सारांश पाहिला असता १२ सर्व्हे नंबरच्या या परिसरात अर्थकारण आणि राजकारण या दोन्ही बाजू अतिशय मजबूत आहेत आणि नागरीकांचा कल मात्र मलकापूर ग्रामपंचायतीच्या बाजूने असल्याचे दिसून येते.

## ४.६ उपाययोजना -

भूप्रदेश कोणताही असो, त्या परिसराच्या विकासाकरिता आणि संवर्धनाकरिता निश्चित अशी एक जबाबदार यंत्रणा असावी लागते. अशा जबाबदार यंत्रणेअभावी तो परिसर पोरका आणि भकास बनतो. त्या परिसराचा विकास, संवर्धन आणि त्याचबरोबर नियंत्रण या गोष्टी अत्यंत महत्वपूर्ण ठरतात. किंबहुना अशी व्यवस्था नसेल तर तो परिसर म्हणजे गोंधळ, अराजक किंवा अंधेर नगरी ठरते. असाच काहीसा प्रकार कराड ग्रामीणमध्ये घडलेला दिसतो. त्यामुळे कराड ग्रामीणचा विकास,

संवर्धन आणि नियंत्रण करणे ही एक कठिण बाब बनली आहे. तरीसुद्धा ती अशक्यप्राय: मात्र अजिबात नाही. विकासाकरिता जबाबदार असणाऱ्यांनी, नागरिकांनी ठोस उपाय, प्रामाणीक प्रयत्न व पाठपुरावा केल्यास कराड ग्रामीणचे रूप बदलण्यास वेळ लागणार नाही.

कराड ग्रामीणच्या त्रिशंकू भागाचा विकास करण्यासाठी सर्वात प्रथम कोणती तरी एक स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन झाली पाहिजे. विकासाला जबाबदार प्रतिनिधित्व तयार होईल. विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेला कामगार आणि प्रशासकीय वर्ग निर्माण होईल. या परिसरातील समस्या हळूहळू सुटू लागतील. लोकांच्या समस्या अडीअडचणी लोक या संस्थेकडे मांडतील व त्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत त्या समस्या सोडविणे सहज शक्य होईल.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थापनेनंतर या ठिकाणी टाऊन प्लॅनिंगची गरज असते. नगररचना विभागाकडून या परिसराचे टाऊन प्लॅनिंग होणे अत्यंत गरजेचे आहे. अतिशय चिंचोळे रस्ते, झोपडपट्टीवजा वसाहती, गटारे, भुयारी गटार, सार्वजनिक ठिकाणे, चौक, बागा, रस्त्यांची रचना, घरबांधणीच्या आदर्श पद्धती अशा अनेक गोष्टी टाऊन प्लॅनिंगच्या माध्यमातून साध्य करता येतील. त्यातून या परिसराचा बकालपणा, गलिच्छपणा, दाटी, सांडपाणी आणि पाणी पुरवठयाच्या समस्या दूर होतील. पयार्वरणाचे संतुलन टिकून राहील. ओंगळ आणि अनियंत्रीत वस्त्यांवर प्रभावी नियंत्रण होवून परिसरातील नागरीकांचे जीवन सुसह्य होईल.

कराड ग्रामीण हा भाग एकूणच भारतातल्या सर्व ठिकाणच्या त्रिशंकू भागाच्या हिमनगाचे एक टोक आहे. ही समस्या फक्त कराड- ग्रामीणचीच नाही तर भारतातील सर्व राज्यांमध्ये दिसून येणारी ही सार्वत्रिक स्वरूपाची समस्या आहे. या समस्येचे स्वरूप देशव्यापी असल्यामुळे त्यासंदर्भात केंद्रीय सरकारने ठोस पाऊले उचलली पाहिजेत.

या परिसराच्या विकासासंदर्भात विचार करता आणखी एक महत्त्वपूर्ण गोष्ट साध्य करता येवू शकेल. ती म्हणजे कराड नगरपरिषद हद्दीमध्ये या परिसराला सामील करणे होय. या परिसराच्या सर्वांगीण विकासाकरिता हा एक राजमार्ग ठरेल. कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट केल्यामुळे नगरपालिकेकडे असणाऱ्या सर्व यंत्रणा, भौतिक सामग्री, तंत्रज्ञान, कर्मचारी वर्ग, जबाबदार प्रतिनिधी, प्रशासकीय कार्यालये, मनुष्यबळ, इ. बाबी तातडीने उपलब्ध होतील आणि विकासाला जलद गती प्राप्त होईल. स्थानिक स्वराज्य संस्थेची गरज संपेल व विकासाला चालना मिळेल.

कराड ग्रामीणच्या विकासाकरिता जेवढया उपाययोजना उपरोल्लेख केल्या आहेत या सर्व बाबी या तेथील नागरीक सोडून इतरांनी करावयाच्या आहेत. त्यामध्ये स्थानिक लोकसहभाग नाही. परंतु जर या परिसराचा कायापालट करावयाचा असेल तर सर्वात महत्त्वाची आणि प्रथम गोष्ट "तेथील नागरीक, त्यांचा सहभाग आणि त्यांची मानसिकता" ही आहे. मराठीमध्ये एक म्हण आहे, "गाव करील ते राव काय करील" या म्हणीचा वास्तविकपणे इथल्या नागरीकांनी स्वीकार केल्यास विकास प्रक्रिया अवघड नाही. स्थानिक राजकारणाचे काय व्हायचे ते व्होवो, शासकीय पातळीवरील प्रयत्नांचे आणि योजनांचे काय व्हायचे वे व्होवो, परंतु लोकांनी मोठया प्रमाणामध्ये विकास प्रक्रियेकरिता उठाव, जनआंदोलने आणि जनरेटा लावल्यास इथल्या सर्व प्रश्नांची उकल होऊन जनजीवन सुरळीत होईल. गरज आहे ती इथल्या लोकांच्या मानसिकतेची, स्थानिक कार्यकर्ते, समाजसेवी संस्था, संघटना यांनी याकरिता परिसरात जनजागृती अभियान राबविले पाहिजे. लोकांना त्यांच्या आरोग्य, सेवा, सुविधा, सवलतींची, अधिकारांची माहिती करून दिली पाहिजे व व्यापक एकजिनसी लोकसमुदाय संघटीत करून जनरेटा उभा केल्यास शासन संस्थेला या प्रश्नी निर्णय घ्यावा लागेल व या प्रश्नावर, समस्येवर मात करता येवू शकेल.

**संदर्भ**

१. देशपांडे चं. धू., शहरे, पृ. १.

२. ७६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कराड-२००३, स्मरणिका,पृ. ५१.

३. गांधी मो. क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, पृ. २०७.